# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

## ई निविदा सूचना

जा.क्रं.नांवाशमनपा/विद्युत/ई निविदा/ 10391 /२०२५-२६ दिनांक : 06/11/2025

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराकडुन खाली दर्शविण्यात आलेल्या कामाकरिता ब-१ नमुन्यात निविदा मागवित आहेत. या निविदा महानगरपालिके च्या वेबसाईट (http://mahatenders.gov.in) वरुन खरेदी करता येईल. निविदेच्या अटी व शर्ती वेबसाईटवर नमूद असतील. निविदा फक्त इंटरनेट वरुन खरेदी करता येतील व इंटरनेट वरुन भरता येतील. सर्व कंत्राटदारांना Digital Signature चे रजिष्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

ई निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ. क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई निविदा प्रकाशित करणे | दि. 08/11/2025 | १५.०० |
| २ | ई निविदा डाऊनलोड करणे | दि. 08/11/2025 | १५.०० |
| ३ | ई निविदा भरणे | दि. 08/11/2025 | १५.०० |
| ४ | ई निविदा भरण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. 14/11/2025 | १५.०० |
| ५ | ई निविदा उघडणे | दि. 17/11/2025 | १५.०० |

| अक्रं | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम रु. | इसारा रक्कम रु. १ % | कोऱ्या निविदा किंमत रु. | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील तरोडा प्रभाग क्र. ०१ व ०२ येथे मनपा निधी अंतर्गत विविध ठिकाणी LED Lights बसविणे बाबत | ८४०२५५.०० | ८४२६.०० | ५०० + वस्तु सेवा कर | सहा महिने |
| ०२ | नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील प्रभाग क्र. १२ (ड) येथिल विविध मस्जिदच्या ठिकाणी हायमास्ट पोल व LED Lights बसविणे बाबत | २८६९२६.०० | २८६९.०० | ५०० + वस्तु सेवा कर | सहा महिने |

### निविदाचे अटी व शर्ती

१. कंत्राटदाराने खालील प्रमाणे कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

०१. कंत्राटदाराने ई निविदा पोर्टलवर बिड लॉक झाल्यानंतर निविदा बाबत हार्ड कॉपी १ प्रतीत दिनांक रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत शहर अभियंता, मनपा यांचेकडे सादर करणे अनिवार्य आहे.

०२. महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग/मुख्य विद्युत निरीक्षक मुंबई यांचेकडील विद्युत ठेकेदाराची चालू योग्य त्या वर्गाची अनुज्ञाप्ती प्रमाणपत्राची सत्यप्रत सादर करणे आवश्यक आहे.

०३. पॅन कार्ड व मागील तिन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

०४. जी.एस.टी.नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

०५. विद्युत व्यवस्थेचे काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र.

०६. ई.पी.एफ. व ई.एस.आय.सी. नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

०७. महाराष्ट दुकाने व आस्थापना अधिनियम २०१८ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

०८. सा.बा.विभागाचा शासन निर्णय क्रं सीएटी २०१८/प्रक्रं १२७/इमार दि.२८/११/२०१८ मधील शुध्दीपत्रक कंत्राटदाराने रु.१००/- च्या बॉन्ड पेपरवर सादर केलेल्या कागदपत्र खरी,बरोबर व पूर्ण आहेत,त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत म्हणून शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

०९. अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या निविदा भरल्यास सा.बा.विभागाचा शासन निर्णय क्रं सीएटी / २०१७ / प्रक्रं८ / इमा २ दि.२९/९/२०१८ मधील शुध्दीपत्रक दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ नुसार लिफाफा क्रं १ व २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या एल-१ निविदाधारकाने Additional performance security deposit आठ दिवसाच्या आत शहर अभियंता यांच्याकडे जमा करावे.

१०. सा.बा.विभागाचा शासन निर्णय क्रं संकीर्ण २०२१/प्र.क्रं.५४/इमारती २ दि.०७/१२/२०२३ मधील परीशिष्ट "अ" तरतुदीनुसार सदर कामासाठी मागील पाच वर्षाचे सर्व कामांचे Work Done प्रमाणपत्र व वार्षिक उलाढाल (Turnover) दर्शविणारे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले कागदपत्रे तसेच परीशिष्ट "ब" तरतुदीनुसार उपलब्ध मनुष्यबळ लागणार आहे त्यांचा तपशील विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

२. कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचे अधिकार मा. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांनी राखुन ठेवलेला आहे.

३. सदर कामी विमा काढणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.

४. या कामासाठी कंत्राटदारांनी काम पूर्ण झाल्यावर एक वर्षाची वॉरंटी द्यावे लागेल व वॉरंटी काळात नि:शुल्क दुरुस्ती करुन द्यावे लागेल.

स्वा.
शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रतिलिपी

१. नोटीस बोर्ड, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
२. ई टेंडरिंग विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

पत्ता: वजीराबाद, नांदेड ई-मेल पत्ता info@nwcmcnanded.org दुरध्वनी (०२४६२) २३४०४

ई निविदा सूचना.क्रं.नांवाशमनपा/विद्युत/ 1039 /२०२५-२६ दिनांक : 06/11/2025

आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याकडुन नोंदणीकृत विद्युत कंत्राटदाराकडुन १. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील तरोडा प्रभाग क्र. ०१ व ०२ येथे मनपा निधी अंतर्गत विविध ठिकाणी LED Lights बसविणे बाबत २. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील प्रभाग क्र. १२ (ड) येथिल विविध मस्जिदच्या ठिकाणी हायमास्ट पोल व LED Lights बसविणे बाबत या कामासाठी ब-१ नमुन्यात निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र संकेतस्थळावर (http://mahatenders.gov.in) येथून डॉऊनलोड करण्यात यावे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा अटी, शर्ती व ई निविदाची सर्व माहीती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

स्वा.
शहर अभियंता,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रतिलिपी माहितीस्तव व पुढील कार्यावाहिस्तव

१. मा.संपादक दै. लोकपत्र / दै. टाईम्स ऑफ गौरव यांना देऊन विनंती करण्यात येते की, रील निविदा सूचना आपल्या दैनिकात दिनांक 08/11/2025 च्या अंकात 12x12 चौ.से.मी.जागेत प्रसिध्द करुन दोन प्रति मध्ये देयक व अंकाच्या दोन प्रति सादर करावे.
२. मुख्य लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
४. नोटीस बोर्ड,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.
५. ई टेंडरिंग विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

शहर अभियंता
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड